Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

Original Article

# दलित साहित्य आणि वास्तवता : एक सामाजिक अभ्यास

**अमोल शिवाजी गोसावी[1], डॉ.संजय शिंदे[2]**
[1]संशोधक विद्यार्थी, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर, पुणे
[2]संशोधक मार्गदर्शक, मराठी विभाग प्रमुख, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर ता.खेड. जि.पुणे
**Email:** gosaviamol5777@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-171214
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 12(A)
Pp. 74-76
December 2025

**Submitted:** 16 Nov. 2025
**Revised:** 26 Nov. 2025
**Accepted:** 11 Dec. 2025
**Published:** 31 Dec. 2025

***सारांश***

*प्रस्तुत संशोधन लेखात "दलित साहित्य आणि वास्तवता : एक सामाजिक अभ्यास" या विषयाचा सखोल विचार करण्यात आला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात, विशेषतः १९६० नंतर उदयास आलेल्या दलित साहित्याच्या संकल्पनेचा उगम, विकास आणि त्यामागील सामाजिक-वैचारिक प्रेरणा यांचा अभ्यास लेखात करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेचा दलित साहित्यावर झालेला मूलगामी प्रभाव, आंबेडकरी चळवळ आणि दलित पँथर चळवळीमुळे साहित्याला मिळालेला विद्रोही स्वर याचे विश्लेषण येथे आढळते. दलित साहित्याने दारिद्र्य, जातीय विषमता, शोषण, अपमान आणि अन्याय यांचे वास्तववादी चित्रण करून पारंपरिक साहित्यिक मूल्यांना आव्हान दिले आहे. तसेच या साहित्याने मानवमुक्ती, समता, स्वातंत्र्य आणि न्याय या मूल्यांवर आधारित नव्या समाजनिर्मितीचा ध्यास मांडला आहे. त्यामुळे दलित साहित्य हे केवळ वाङ्मयीन प्रवाह न राहता एक प्रभावी सामाजिक चळवळ म्हणून उदयास आले आहे.*

***मुख्य शब्द:*** *दलित साहित्य, सामाजिक वास्तवता, आंबेडकरी विचारधारा, जातीय विषमता, विद्रोह, सामाजिक परिवर्तन, मानवमुक्ती*

## प्रस्तावना

आधुनिक साहित्याच्या इतिहासात दलित साहित्य हा एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि परिवर्तनशील साहित्यप्रवाह उदयास आला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात, विशेषतः १९६० नंतर, सामाजिक आणि साहित्यिक विचारांच्या दुहेरी मंथनातून ही संज्ञा पुढे आली आणि विशेष चर्चेचा विषय ठरली. दलित साहित्याच्या निर्मितीमागचा हेतू केवळ मनोरंजन नव्हे तर स्वतःला आणि स्वतःच्या समाजाला पारंपरिकतेच्या मगरमिठीतून बाजूला करणे हा आहे. त्यामुळे दलित साहित्यामधून सामान्यत: भावनाभिव्यक्तीला फारसे स्थान नाही. त्यापेक्षा विचार प्रकटनाला अधिक प्राधान्य आहे. दलित साहित्य निर्मिती मागील एक कारण म्हणजे, पारंपरिक भारतीय साहित्याने गावकुसाबाहेरच्या जीवनाची आणि शोषणाची दखल घेतली नाही. या दुर्लक्षितपणामुळे, एका मोठ्या समूहाला त्यांचे जगणे, त्यांचे दुःख आणि त्यांच्या वेदना व्यक्त करण्यासाठी स्वतःची लेखनशैली, स्वतःची भाषा आणि स्वतःचा नायक निर्माण करण्याची गरज भासली. या गरजेतूनच एक स्वतंत्र साहित्य प्रवाहाचा जन्म झाला, ज्याचा मूळ उद्देश सामाजिक परिवर्तन घडवणे हा होता. त्यामुळे, दलित साहित्य हा केवळ एक वाङ्मयीन प्रवाह नसून, ती एक सशक्त सामाजिक चळवळ आहे.

## उद्दिष्टे

१) दलित साहित्यावरील आंबेडकरी चळवळींचा प्रभाव अभ्यासणे.
२) दलित साहित्यातील सामाजिक विषमतेचा अभ्यास.
३) दलित साहित्य निर्मिती मागील प्रेरणांचा अभ्यास.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*अमोल शिवाजी गोसावी, संशोधक विद्यार्थी, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर, पुणे*

**How to cite this article:**
*गोसावी, . अमोल . शिवाजी ., & शिंदे, . संजय . (2025). दलित साहित्य आणि वास्तवता : एक सामाजिक अभ्यास. Journal of Research and Development, 17(12(A)), 74–76. https://doi.org/10.5281/zenodo.18183985*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18183985
OPEN ACCESS

**१) दलित साहित्याची संकल्पना**

'दलित' या शब्दाचा अर्थ 'दबलेला', 'चिरडलेला', 'भरडलेला' असा होतो. हे शब्द केवळ नैसर्गिकरित्या घडणाऱ्या घटनांचे वर्णन करत नाहीत, तर ते जाणीवपूर्वक आणि नियोजनपूर्वक केलेल्या शोषणाचे प्रकटीकरण करतात. इथे चिरडणारा आणि चिरडला गेलेला, तुडवणारा आणि तुडवला गेलेला अशी दोन स्पष्ट रूपे लक्षात येतात. हे 'दलितत्त्व' मानवनिर्मित असून, ते एका मानव समूहाने दुसऱ्या समूहावर लादलेले आहे. दलित साहित्याच्या संदर्भात 'दलित' ही संज्ञा कोणत्याही एका जातीपुरती मर्यादित नाही, तर ती सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि धार्मिक शोषणामुळे पीडित झालेल्या सर्व जाती, गट आणि वर्गांना सूचित करते. सुरुवातीला 'दलित' हा शब्द दीन-दुबळयांसाठी वापरला जात असला तरी, आधुनिक दलित साहित्याने त्याला आत्मसन्मान आणि विद्रोहाचे प्रतीक म्हणून स्वीकारले आहे. दलित साहित्याची चळवळ हे दलित चळवळीचेच एक अंग आहे. महात्मा गांधींनी वापरलेला 'हरिजन' हा शब्द धार्मिक आणि दयेच्या भावनेशी जोडलेला होता. याउलट, डॉ. आंबेडकरांच्या विचारधारेतून 'दलित' या शब्दाला स्वतःच्या शोषणाची जाणीव आणि त्याविरोधात संघर्ष करण्याची चेतना मिळाली. यामुळे 'दलित' ही संज्ञा निव्वळ शोषणाचे वर्णन न करता, त्याविरोधातील संघर्षाची आणि अस्मितेची ओळख बनली.

**२) इ.स १९६० पूर्वीच्या दलित साहित्याचा आढावा**

इ.स १९६० पूर्वीच्या काळातले साहित्य थेट "दलित साहित्य" या संज्ञेत समाविष्ट होत नसले तरी त्यातून दलितांच्या जाणीवा, वेदना आणि संघर्षाचे चित्रण स्पष्टपणे जाणवते. दलित साहित्याच्या इतिहासाचे मूळ भक्तीचळवळीतील संत नामदेव, संत चोखामेळा आणि इतर संतांच्या साहित्यात आढळते. त्यांनी पारंपरिक, धार्मिक आणि सामाजिक रूढींना आव्हान देऊन समानतेचा पुरस्कार केला. आधुनिक दलित साहित्याचा वैचारिक पाया महात्मा ज्योतिबा फुले यांच्या 'गुलामगिरी' या ग्रंथाने रचला गेला. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लेखनातून, विशेषतः 'Annihilation of Caste' या ग्रंथातून, भारतीय समाजव्यवस्थेचे मूलगामी विश्लेषण करून या साहित्याला एक भक्कम वैचारिक बैठक दिली. तसेच या काळात नियतकालिकांची एक परंपरा निर्माण झाली. "प्रबुद्ध भारत", "मूकनायक", "बहिष्कृत भारत" या नियतकालिकांमधून दलित प्रश्नांवर चर्चा व चिंतन होत होऊन दलितांना लेखनाची संधी आणि अभिव्यक्तीची ताकद दिली.

**३. आंबेडकरी चळवळ आणि दलित साहित्य**

दलित साहित्याचे एकमेव प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. त्यांचे जीवन, त्यांचे ग्रंथांतून मांडलेले मूलगामी क्रांतिकारी तत्त्वज्ञान आणि त्यांनी दिलेली 'शिक्षित व्हा, संघटित व्हा, संघर्ष करा' ही शिकवण दलित लेखकांना प्रेरणा देते. डॉ. आंबेडकरांनी वर्णव्यवस्था ही केवळ श्रमाचे विभाजन नसून, ती श्रमिकांचे विभाजन आहे, असे सांगितले. या विचारांमुळे दलित साहित्याने वैयक्तिक दुःखाला सामाजिक आणि वैचारिक पातळीवर मांडण्यास सुरुवात केली. त्यांनी हिंदू धर्मग्रंथांचे (विशेषतः मनुस्मृतीचे) गंभीर अध्ययन करून त्यांना थेट आव्हान दिले. यामुळे दलित साहित्याने धार्मिक पाखंडवाद, अंधश्रद्धा आणि कर्मकांडांना निग्रहाने नाकारले. डॉ. आंबेडकरांनी "गुलामांना त्यांच्या गुलामगिरीची जाणीव करून द्या, ते आपोआप बंड करतील" असे म्हटले होते. या विचारातूनच दलित लेखकांना स्वतःचे दुःख आणि वेदना ही वैयक्तिक समस्या नसून, ती एका सामाजिक व्यवस्थेमुळे निर्माण झालेली आहे याची जाणीव झाली. या जाणीवेमुळे त्यांच्या लेखनाला वैयक्तिक अभिव्यक्तीच्या पलीकडे जाऊन एका क्रांतीचा, सामाजिक परिवर्तनाचा आणि मानवमुक्तीचा उद्देश प्राप्त झाला. डॉ. आंबेडकरांनी सुरू केलेली 'मूकनायक' (१९२०), 'बहिष्कृत भारत' (१९२७), 'जनता' (१९२९) आणि 'प्रबुद्ध भारत' (१९५५) ही वृत्तपत्रे दलित साहित्याची वैचारिक पार्श्वभूमी तयार करणारी ठरली. या वृत्तपत्रांनी शोषित समाजाचे प्रश्न निर्भीडपणे मांडले आणि त्यांच्यात वैचारिक जागृती घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. या वृत्तपत्रांनी समाजात विचारांचे मंथन घडवून आणले, ज्याचा फायदा १९७० नंतरच्या दलित साहित्य निर्मितीला मोठ्या प्रमाणात झाला. १९७२ साली स्थापन झालेल्या दलित पँथर चळवळीने दलित साहित्याला एक नवीन आणि तीव्र विद्रोही स्वरूप दिले. अमेरिकेतील 'ब्लॅक पँथर' चळवळीचा प्रभाव यावर होता. ही चळवळ केवळ राजकीय आणि सामाजिक नसून, तिचा साहित्यावरही मोठा प्रभाव पडला. या चळवळीने 'दलित' आणि 'आंबेडकरी' साहित्यामध्ये एक वैचारिक वाद निर्माण केला. पँथरच्या साहित्यिकांनी मार्क्सवादालाही आंबेडकरवादासोबत जोडण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नामुळे साहित्याची भाषा आणि सौंदर्यशास्त्र दोन्ही बदलले. नामदेव ढसाळ आणि राजा ढाले यांच्यासारख्या कवींच्या लेखनातून वेदनेचा भाव अधिक उग्र आणि आक्रमक बनला, ज्यामुळे साहित्याला एक नवी दिशा निर्माण झाली.

**४) दलित साहित्यातील सामाजिक वास्तवता आणि विद्रोह**

दलित साहित्याने दारिद्र्य, भूक, अस्पृश्यता, अन्याय, अत्याचार, अपमान आणि जातीय भेदभावाचे अनुभव प्रत्यक्षपणे आणि निर्भीडपणे मांडले आहेत. या साहित्याचा केंद्रबिंदू सामान्य माणूस आहे. पारंपरिक साहित्याने चित्रित केलेले ग्रामीण जीवन आणि दलित

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

साहित्याने मांडलेले जीवन यात मोठा फरक आहे. पारंपरिक साहित्याने दलितांच्या जीवनाचे चित्रण सहानुभूतीच्या भूमिकेतून केले असले तरी, त्यात शोषणाचे अनुभव प्रत्यक्ष भोगलेले नसल्यामुळे त्यात प्रामाणिकपणाचा अभाव जाणवतो. याउलट, दलित लेखकांनी स्वतःच्या आणि समाजाच्या वेदना थेट मांडल्यामुळे त्यांचे लेखन अधिक अस्सल आणि प्रभावी ठरले. दलित साहित्यातील पात्रे केवळ कथानक सजवण्यासाठी नाहीत, तर ती परिवर्तन घडवणारी, क्रांतिकारक आणि जिवंत वाटतात. हजारो वर्षांच्या गुलामगिरीनंतर डॉ. आंबेडकरांच्या चळवळीमुळे दलितांना 'मी माणूस आहे' या अस्मितेचे भान आले. या आत्मभानामुळे दलित कादंबऱ्यांमधील पात्रेही परिस्थितीशी विद्रोह करताना दिसतात. दलित कादंबऱ्यांनी खेड्यातील दलितांचे वास्तववादी चित्रण केले आहे, ज्यात त्यांचे राहणीमान, गरिबी, व्यवसाय आणि त्यातून होणारी कुचंबना याचे सखोल दर्शन घडते. दलित साहित्याने पारंपरिक मूल्यांचा आणि विचारधारांचा स्पष्ट शब्दात धिक्कार केला. या साहित्याने ईश्वरवाद, ग्रंथप्रामाण्य, कर्मकांड आणि जातीव्यवस्था यांना थेट आव्हान दिले. हा विद्रोह केवळ प्रतिक्रियात्मक नसून, तो महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकरांच्या बुद्धिप्रामाण्यवादी आणि मानवतावादी तत्त्वज्ञानावर आधारित आहे. हा विद्रोह दुःख, वेदना आणि चिडीतून जन्म घेतो , पण त्याला डॉ. आंबेडकरांच्या 'समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय' या मूल्यांचा भक्कम वैचारिक आधार आहे. त्यामुळे, हा विद्रोह केवळ विध्वंसक नसून, एका नवीन, मानवी मूल्यांवर आधारित समाजाची निर्मिती करण्याचा प्रयत्न करतो. दलित साहित्य हे केवळ दलितांच्या वेदनांचा दस्तऐवज नसून, ते एका समाज क्रांतीचे अभियान आहे.

**५. दलित साहित्यातील आधुनिकतावाद**

आधुनिकतावाद ही मूलतः पाश्चात्त्य संकल्पना आहे, जी औद्योगिकीकरण आणि शहरीकरणामुळे निर्माण झालेल्या सामाजिक बदलांचे चित्रण करते. हा प्रवाह पारंपरिक विचारांपासून फारकत घेऊन नवीन अभिव्यक्तीचा शोध घेतो. तथापि, दलित साहित्यातील आधुनिकतावाद हा पाश्चात्त्य आधुनिकतावादापेक्षा वेगळा आहे आणि त्याला भारतीय सामाजिकतेच्या संदर्भात नव्याने परिभाषित केले गेले आहे. दलित साहित्याने केवळ 'परंपरा' नाकारली नाही, तर विशिष्ट 'धर्माधिष्ठित' आणि 'मनुवादी' परंपरा नाकारून विज्ञाननिष्ठा, बुद्धिप्रामाण्यवाद, मानवतावाद आणि स्वातंत्र्य-समतेच्या नव्या मूल्यांवर आधारित जीवनदृष्टी स्वीकारली. पाश्चात्त्य आधुनिकतावाद हा मुख्यतः औद्योगिकीकरणामुळे निर्माण झालेल्या वैयक्तिक स्वातंत्र्याचे चित्रण करतो. याउलट, दलित साहित्यातील आधुनिकतावाद हा वर्ण-जाती व्यवस्थेने लादलेल्या मानसिक, सामाजिक आणि धार्मिक गुलामगिरीतून मुक्ती मिळवण्याचा प्रयत्न आहे. हे साहित्य जुने आदर्श आणि ईश्वरवाद नाकारते , ज्यामुळे ते स्वतःच आधुनिक विचारांचे प्रणेते ठरते. दलित साहित्याची आधुनिकता ही केवळ वाङ्मयीन शैलीतील बदल नसून, ती एका वैचारिक क्रांतीची अभिव्यक्ती आहे. या प्रवाहाने मराठी साहित्याच्या मुख्य प्रवाहात एक वेगळे स्थान निर्माण केले. आत्मकथा, कविता आणि नाटकांसारख्या साहित्य प्रकारांना त्यांनी एक नवे अनुभवविश्व दिले.

**निष्कर्ष**

दलित साहित्य हे केवळ साहित्याचे स्वरूप नसून, ते एका सामाजिक क्रांतीचे आणि परिवर्तनाचे साधन आहे. त्याची निर्मिती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक चळवळीतून झाली आहे. डॉ. आंबेडकर हे केवळ दलितांचे नेते नव्हते, तर त्यांच्या विचारांनी दलित साहित्याला तत्त्वज्ञानाचा, विद्रोहाचा आणि मानवमुक्तीचा आधार दिला. त्यांचे विचारच या साहित्याचे 'प्राणतत्त्व' आहेत. या साहित्याने पारंपरिक सौंदर्यशास्त्राला आव्हान देऊन एक नवीन सौंदर्यदृष्टी निर्माण केली आहे, जी वेदना आणि विद्रोहावर आधारित आहे. दलित साहित्याने भारतीय समाजाला त्याच्या सर्वात क्रूर आणि कटू वास्तवाचा आरसा दाखवला. सुरुवातीला केवळ मराठीत विकसित झालेला हा प्रवाह आता भारतीय आणि जागतिक स्तरावर चर्चेचा विषय बनत आहे. या साहित्यातील मानवी मूल्यांचा पुरस्कार आणि शोषणाविरुद्धचा विद्रोह हा कोणत्याही भौगोलिक सीमेपलीकडील आहे. त्यामुळे दलित साहित्य हे भारतीय साहित्याच्या इतिहासातील एक अविभाज्य आणि अपरिहार्य अध्याय बनले आहे.

**संदर्भ सुची**

1. आंबेडकर भीमराव रामजी, Annihilation of Caste, सरस्वती प्रकाशन, मुंबई: १९३६.
2. पवार दया, बलुतं, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९७८.
3. ढसाळ नामदेव, गोलपीठा, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९७२.
4. लिंबाळे शरणकुमार, अक्करमाशी, लोकवाङ्मय गृह, पुणे, १९८४.
5. माने, लक्ष्मण. उपरा. मुंबई: ग्रंथाली प्रकाशन, १९८०.
6. पानतावणे गंगाधर, दलित साहित्याची संकल्पना, सत्यम प्रकाशन, नागपूर, १९७९.
7. कांबळे अरुण, महाराष्ट्रातील दलित साहित्य चळवळ, मीरा प्रकाशन, पुणे, १९९१.